सुरक्षित भविष्यासाठी योग्य निर्णय
''आजचा योग्य निर्णय, उद्याची सुरक्षितता''
जीवन विमा, निवृत्ती योजना, मुलांच्या शिक्षणाची बचत, कर सवलत, विषयी काही अडचणी असतील तर तात्काळ संपर्क साधा
LIC
(आजच संपर्क करा)
तुमचा विश्वासू सहप्रवासी
विमा प्रतिनिधी : रतनकुमार साळवे, छत्रपती संभाजीनगर
९९२३५०२३२० | ८९०८८६७७७७

साप्ताहिक
# निळे प्रतिक



मुख्य संपादक : रतनकुमार साळवे
एम.ए.(एम.सी.जे.), एम.ए.(फुले-डॉ.आंबेडकर थॉट),
एम.ए. (पाली अँड बुद्धिझम), मो. ९९२३५०२३२०

वर्ष १६ वे | अंक क्र. ११ | सोमवार | ११ ऑगस्ट २०२५ | पृष्ठे ४, किंमत २ रु.

## मनपात कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन, भत्ता व विमा हमी ; ठेकेदारांच्या मनमानीला लगाम घालण्याची तयारी

छत्रपती संभाजीनगर : मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन, सुरक्षा आणि हक्कांबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करताना किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी, कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा, तसेच विशेष पगार वाढीचा भत्ता देण्याची तरतूद नव्या धोरणामध्ये केली जाणार आहे. हे धोरण ठरविण्याची जबाबदारी मनपा प्रशासक आणि आयुक्त जी. श्रीकांत यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

**ठेकेदारांची मनमानी आणि राजकीय संरक्षण**

याआधी मनपा कंत्राटी कर्मचाऱ्यांना ठेकेदारांकडून केवळ पगाराच्या सुमारे ५० टक्केच रक्कम दिली जात होती. उर्वरित रक्कम ठेकेदारांकडेच राहात असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण होत होते. ठेकेदार हे सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्यावर कोणीही प्रश्न उपस्थित करत नव्हते. राजकीय वरदहस्त असल्यामुळे, या कटात मनपाचे अधिकारी सुद्धा समाविष्ट असल्यामुळे ''तेरी भी चुप, मेरी भी चुप'' असा प्रकार वर्षानुवर्षे सुरू होता. कंत्राटदारांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या जीवावर कोट्यवधी रुपये कमावले. एका कर्मचाऱ्यावर एक हजार रुपये नफा देखील ग्राह्य धरला असता, पण प्रत्यक्षात एका कर्मचाऱ्यावर जवळपास १० ते १२ हजार रुपये ठेकेदार वसूल करत असल्याचा आरोप आहे. ही परिस्थिती अत्यंत संतापजनक असल्याचे कामगारांनी सांगितले.

**यापूर्वी पाऊल न उचलणारे अधिकारी**

महानगरपालिकेत यापूर्वी आलेल्या अधिकाऱ्यांना देखील या अन्यायाची पूर्ण जाणीव होती, मात्र त्यांनी कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही. त्यामुळे कामगारांमध्ये नाराजी आणि असंतोष वाढत गेला.

**सकारात्मक भूमिका आणि दिलासा**




या पार्श्वभूमीवर आयुक्त जी. श्रीकांत यांनी सुरुवातीपासूनच सकारात्मक आणि ठाम भूमिका घेतली. पुण्यातील 'यशदा' येथे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रशिक्षण सत्रात या विषयावर सविस्तर चर्चा झाली. कंत्राटी भरती प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर उपाय म्हणून स्वतंत्र नियमावली (एसओपी) तयार करण्याचा निर्णय झाला. किमान वेतन, विमा संरक्षण आणि भत्ता मिळणार या दिलासादायक बातमीमुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. आता त्यांच्या अपेक्षा या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी होऊन किमान वेतन थेट त्यांच्या खात्यावर जमा होण्यावर केंद्रित आहेत. ''जी. श्रीकांत साहेब ही जबाबदारी अत्यंत उत्तम पद्धतीने पार पाडतील, याबाबत आम्हाला शंका नाही,'' असे कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विश्वासाने सांगितले.

## संभाजीनगरच्या प्रवाशांना मुंबईसाठी सोयीची रेल्वे सुरू होणार

छत्रपती संभाजीनगर : वंदे भारत एक्स्प्रेसचा विस्तार नांदेडपर्यंत केला असून, नव्या वेळापत्रकानुसार २७ ऑगस्टपासून ही रेल्वे नांदेडहून निघणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरकरांची मोठी अडचण झाली आहे. तूर्तास छत्रपती संभाजीनगरची पिटलाइन तयार नाही. त्यामुळे जालन्यातील पिटलाइन वापरून येत्या ऑक्टोबरमध्ये नवीन वंदे भारत' एक्स्प्रेस छत्रपती संभाजीनगर येथून धावणार आहे, अशी माहिती खासदार डॉ. भागवत कराड यांनी रविवारी (१० ऑगस्ट) रेल्वे स्थानकावर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.दोन महिन्यांत वंदे भारतचा दुसरा कोटा मिळणार असून, छत्रपती संभाजीनगरचे ओद्योगिक, पर्यटन, शैक्षणिक महत्त्व लक्षात घेता मुंबईसाठी सकाळच्या वेळेत रेल्वे देण्याचे रेल्वेमंत्री यांनी मान्य केल्याचा दावा त्यांनी केला. छत्रपती संभाजीनगरच्या पिटलाइनचे काम प्रगतीपथावर आहे. यासह स्लीपलाइन व स्टेबलिंग लाइन आदी कामांना विलंब आहे. सीकलाइन १५० मीटरची आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी विशेष व्यवस्थापक सुनील बिरारे, वरिष्ठ सेक्शन अभियंता पंकज कुमार, चंदनकुमार रंजन आदींची उपस्थिती होती.


## हरियाणा निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली

हिसार : हरियाणाचे मुख्य निवडणूक अधिकारी ए. श्रीनिवास यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना नोटीस पाठवली आहे. मतदार यादीतील अनियमिततेचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेबाबत राज्य निवडणूक आयोगाने १० दिवसांत उत्तर मागितले आहे. त्यांना मतदार यादीशी संबंधित कागदपत्रे आणि स्वाक्षरी केलेले निवेदन देण्यास सांगण्यात आले आहे.

## पोलिसांना जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी राखी बांधा : प्रा. अंजलीताई आंबेडकर

छत्रपती संभाजीनगर : ''जे खाते नागरिकांच्या संरक्षणासाठी स्थापन झाले आहे, तेच जर महिलांचा सन्मान राखत नसेल, त्यांची अवहेलना करत असेल, मारहाण करत असेल, किंवा त्यांच्या तक्रारींना योग्य प्रतिसाद देत नसेल, तर त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याची गरज आहे,'' असे मत वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या प्रा. अंजलीताई आंबेडकर यांनी व्यक्त केले.

त्यांनी सांगितले की, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी महिला आणि पुरुष पोलिसांना राखी बांधून त्यांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली जाईल. ''आज ही राखी केवळ भाऊ म्हणून नव्हे, तर नागरिकांच्या रक्षणकर्त्या म्हणून पोलिसांना त्यांचे कर्तव्य समजविण्यासाठी आहे. जेव्हा पोलिस महिलांच्या तक्रारींवर असे लिहून देतात की घटना सार्वजनिक ठिकाणी घडली नसल्यामुळे दाखल करता येणार नाही, तेव्हा हे त्यांच्या कर्तव्याच्या विरोधात आहे,'' असे त्या म्हणाल्या. प्रा. आंबेडकर यांनी स्पष्ट केले की हा उपक्रम ''अबला'' म्हणून नव्हे, तर जागरूक नागरिक म्हणून पोलिसांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी रक्षाबंधन निमित्त हाती घेतला आहे.



# संपादकीय...

## बहुजन समाज, वापरलेला नव्हे, स्वत:ला विकून टाकणारा.?

बहुजन समाजाच्या धार्मिक भावनांना गोंजारून, त्यांच्या गळ्यात ''संस्कृतीरक्षक''चे गोंडे घालून, संघाने आणि त्यांच्या राजकीय हातांनी सत्ता गाजवली. आणि मग आपल्याच लोकांकडून नेहमीची जुनी हुकमी ओरड ''आम्हाला वापरून घेतलं'' अरे पण, वापरताना तुमची अक्कल कुठे चरायला गेली होती? ती गवतावर होती की चारा संपल्याने शेण खायला गेली होती?

धार्मिक कट्टरवाद्यांनी, सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी तुमच्यावर विचारांचे विष पेरले, तुम्हाला खरा इतिहास कळू दिला नाही, तुम्हाला ज्ञानापासून वंचित ठेवलं हे सगळं ऐकून आता कंटाळा आलाय. हे रडगाणं एकेकाळी तथ्य असू शकलं असेल, पण किती वर्षं त्यावर थापा मारून जगणार?

ज्योतिबा फुलेंनी स्त्री शिक्षणाची मशाल पेटवली, राजर्षी शाहूंनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचं केलं, बाबासाहेब आंबेडकरांनी ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'' असा महामंत्र दिला, कर्मवीर भाऊराव पाटलांनी गावोगावी शाळा उभारल्या. ह्या सगळ्या क्रांतिकारकांच्या कार्यामुळे शिक्षण घराघरात पोचलं. मग, तीन, चार, पाच पिढ्यांपासून शिक्षणाचा वारसा तुमच्याकडे होता, तरी तुम्ही नेमकं काय शिकलात?

उत्तर सोपं आहे तुम्ही शिकला नाहीत. फक्त साक्षर झालात. पदव्या मिळवल्या, नोकऱ्या केल्या, पण मनानं तुम्ही साक्षर वेठबिगारच राहिलात. अगदी कितीही मोठ्या खुर्चीवर बसलात तरी विचारांमध्ये तुम्ही गुलामच.

देशाची धर्मनिरपेक्ष रचना, गंगाजमनी संस्कृती, ''आयडिया ऑफ इंडिया'' हा वारसा तुम्हाला मिळाला होता. पण तो जपण्याऐवजी जेव्हा धर्माच्या नावानं डोकं फिरवायला कोणी आलं, तेव्हा तुम्हीच फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुतळ्यांवर गुलाल उधळून, पाच रुपयांच्या हारांच्या माळा चढवून खुश झालात. विचारांच्या दिव्याऐवजी मिरवणुकीतल्या ढोलताशांना नाचलात.

बहुजन समाज जेव्हा कट्टरवादी, जातीयवादी लोकांना सन्मानाने शैक्षणिक कार्यक्रमात बोलावून, त्यांच्या गळ्यात ''संस्कृती रक्षक''च्या माळा घालतो, त्यांना मंचावर बसवतो तेव्हा वापरून घेण्यासाठी सुवर्णसंधी तुम्हीच उपलब्ध करून देता. कारण अभिजन होण्याचा कंड तुमच्यातच आहे. फुलेआंबेडकरशाहू यांचा उपयोग तुम्ही फक्त नाव घेण्यासाठी, भाषणात टाळ्या पिटवण्यासाठी, फोटोला हार घालण्यासाठी करता. प्रत्यक्ष कृतीत मात्र त्यांच्या शिकवणीच्या उलट कामं करता, आणि शेवटी परत रडता ''आम्हाला वापरून घेतलं''. खरं तर, तुम्हाला आता कुठला सुधारक, कुठला ''दिशादर्शक'' नेता नको. कारण तुमच्या हातात सुधारकांच्या मशाली आल्यावर तुम्ही त्या स्वतः विझवून टाकता. शिक्षणाची गंगा तुमच्या दारात आली, पण तुम्ही ती पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचवण्याऐवजी सांडून टाकली. तुम्हीच तुमच्या पिढ्या बरबाद केल्या. त्यांना बकऱ्या-मेंढ्यांसारखं सनातनी, जातीय लोकांच्या दावणीला बांधलं. आता तुमचं शिक्षण, नोकऱ्या, शेती, हक्क सगळं बुडालं, भिकेला लागायची वेळ आली, तेव्हा परत तोंड फुगवून ''आम्हाला वापरलं'' म्हणता? चारपाच पिढ्यांत ज्यांनी फुले दांपत्य, राजर्षी शाहू, बाबासाहेब आंबेडकर यांसारखे दीपस्तंभ पाहिले, त्या समाजाने त्यांच्या प्रकाशात अक्कल न शिकता, उलट मध्ययुगीन काळात मागे चालत गेलं ही लाज तुम्ही कुठल्या पाण्यानं धुणार?

म्हणून खरं सांगायचं तर, ज्यांनी तुम्हाला वापरून घेतलं त्या सनातनी प्रवृत्तीपेक्षा समाज म्हणून तुम्हीच जास्त नालायक आहात. कारण तुम्ही विचारांचा वारसा फुकट घालवला, स्वाभिमान विकला, आणि अक्कलेला तिलांजली दिली. तुमच्या हातून हरवलेलं हे स्वातंत्र्य कोणी लुटलं नाही तुम्हीच ते विकून टाकलं.
त्याला तुम्ही जबाबदार आहात.

# डॉ. शिलवंत गोपनारायण यांना पीएचडी प्रदान झाल्याबद्दल महात्मा फुले विद्यालयात सत्कार



अकोला : (करामत शाह ग्रामीण प्रतिनिधी, आगर) आगर (अकोला):- येथील महात्मा फुले विद्यालयाचे विद्यार्थी व अकोला तालुक्यातील खेकडी या छोट्याश्या गावामध्ये राहत असलेले प्रा. डॉ. शिलवंत रमेश गोपनारायण यांना ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली त्यांच्या संशोधणाचा विषय ''अ कंपरेटिव्ह स्टडी ऑफ द जनलर पब्लिश बाय अमेरिकन लायब्ररी असोसिएशन'' हा असुन त्यांनी डॉ. मधुकर गरड सेवानिवृत्त ग्रंथालय अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पुर्ण केले आहे. दिनांक ८/०७/२०२५ रोजी त्यांना पी एच डी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली. पदवी प्राप्त झाल्यानंतर महात्मा फुले विद्यालय आगर येथे सत्कार करण्यात आला.

जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. राजेंद्र काळणे यांनी त्यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार व अभिनंदन केले तसेच प्रमोद देंडवे ( जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी ) यांनी सुद्धा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला, यावेळी राजेंद्र काळणे, दिनेश कठोके, एस बी चव्हाण सर, जय हरणे सर, आशुतोष काळणे, मेघमाला काळणे, विलास खोले, विलास जनबंधू, श्रीधर गोपनारायण, अनिरुद्ध गोपनारायण, आकाश गोपनारायण, मोरे साहेब, अमर वासनकार, युवा पत्रकार करामत शाह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी तसेच मित्र मंडळी यांनी गोपनारायण यांचे अभिनंदन केले.

डॉ. शिलवंत रमेश गोपनारायण हे खेकडी गावचे मूळ रहिवाशी असुन विद्यार्थी -प्राध्यापक चळवळीमध्ये संपूर्ण महाराष्टात ते सक्रिय सहभाग नोंदवणारे प्राध्यापक आहेत. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारांना त्याचबरोबर महात्मा फुले विद्यालय आगर येथील शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या शिक्षण पद्धतीला, शिक्षकांनी लावलेल्या शिस्तीमुळे व शिक्षकांच्या विचाराच्या प्रेरणेला तसेच आई वडील, लहान मोठे भाऊ, गुरुजन वर्ग सहकारी मित्र यांना दिले.

# बैल उधळून गळफास, शेतकऱ्याचा मृत्यू,सोयगाव तालुक्यातील पळाशी शिवारातील घटना

दै निळे प्रतिक वृत्तसंस्था / सोयगाव : चरत असताना बैल भडकून हातातील कासरा गळ्यात गुतल्याने शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.२८) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली याप्रकरणी बुधवारी (दि.३०) दुपारी दोन वाजता घटनेचा महसूल विभागाने पंचनामा केला.

लखन नामदेव शिंदे(वय (२४) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे सोयगाव तालुक्यातील पळाशी शिवारात गट क्र-३०५ मध्ये तो स्वतःची दोन्ही बैल शेताच्या बांधावर चारत असताना एक बैल अचानक उधळून त्याच्या हातातील बैलाचा कासरा अचानक गळ्या शी येवून त्याला घट्ट फाशी बसली यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला दरम्यान त्यास तातडीने बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले मंगळवारी दुपारी बारा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्याच्या पश्चात आई,वडील, दोन भाऊ असा परिवार आहे याप्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे...

# दिल्लीत खासदारांसाठी १८४ नवीन घरे

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील बाबा खरक सिंग मार्गावर खासदारांसाठी बांधलेल्या १८४ नवीन फ्लॅट्सचे उद्घाटन करतील. हे सर्व फ्लॅट्स टाइप-७ बहुमजली अपार्टमेंट्स आहेत. मोदी सिंदूर प्लांट लावतील, कामगारांना भेटतील आणि कार्यक्रमाला संबोधित करतील. खासदारांसाठी घरांची कमतरता असल्याने हे नवीन फ्लॅट बांधण्यात आले. मर्यादित जागेमुळे, येथे उंच इमारती बांधण्यात आल्या, जेणेकरून जागेचा अधिक चांगला वापर करता येईल आणि देखभालीचा खर्च कमी करता येईल. प्रत्येक फ्लॅटमध्ये सुमारे ५ हजार चौरस फूट कार्पेट एरिया आहे, ज्यामध्ये खासदारांच्या निवासस्थानाव्यतिरिक्त, त्यांच्या कार्यालयांसाठी, स्टाफ रूमसाठी आणि कम्युनिटी सेंटरसाठी सुविधादेखील आहेत. सर्व इमारती भूकंप प्रतिरोधक आहेत आणि सुरक्षेसाठी मजबूत व्यवस्था करण्यात आली आहे.

हे साप्ताहिक पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक रतनकुमार साळवे यांनी श्री प्रिंटर्स, अक्षयदीप प्लाझा, सिडको येथे छापून अयोध्या नगर, एफ ४/१४, सिडको एन-७, औरंगाबाद पिन ४३१ ००३ (महा.) येथे प्रसिद्ध केले. (या अंकात प्रकाशित झालेल्या वृत्ताविषयी संपादक सहमत असतीलच असे नाही. कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयाअंतर्गत) RNI. No. MAHMAR/2009/29271

# धम्म हा शील सदाचारावर आधारलेला : डॉ रमेशचंद्र धनेगावकर



**सा. निळे प्रतिक वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर : महाप्रजापती गौतमी बुद्ध विहार विपस्सना केंद्र , एन ६ आविष्कार कॉलनी येथे उपासक आणि उपासिकांच्या वतीने आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा वर्षावास कालीन धम्म प्रबोधन मालिका सुरू असुन या पर्वातील श्रावण पौर्णिमा उत्साहात संपन्न झाली.या वेळी धम्म मंचावर प्रमुख व्याख्याते म्हणून ज्येष्ठ धम्म सेवक बौद्ध साहित्याचे गाढे अभ्यासक माजी शिक्षणाधिकारी डॉ रमेशचंद्र धनेगावकर, जेष्ठ धम्म सेवक सामाजिक कार्यकर्ते भानुदासराव बागुल तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ सागर चक्रनारायण यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवात संपूर्ण बुद्ध धम्म संघ वंदना घेऊन झाली. त्यानंतर संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन झाले. मुख्य धम्मसेना बौद्ध साहित्याचे गाढे अभ्यासक माजी शिक्षणाधिकारी डॉ रमेशचंद्र धनेगावकर यांनी दिली.त्यांनी बुद्धकालीन श्रावण पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व विविध उदाहरण देऊन सांगितले.बौद्ध धम्म हा शील सदाचारावर आधारलेला असून मानवी जीवन मौल्यवान करणारा आहे.विश्वातील प्रत्येक सजीव सृष्टीच्या कल्याणाचा विचार धम्मात आहे.जेष्ठ धम्म सेवक सामाजिक भानुदासराव बागुल यांनीही धम्म आणि आंबेडकरी चळवळीचे भविष्य यावर विचार विषद केले. उपासक आणि उपासिकांनी बुद्ध विहारात सम्यक संवाद करावा. यातून आपल्याला दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्यांची उकल धम्माच्या आधारावर होईल.डॉ सागर चक्रनारायण यांनी धम्म आणि तरुण पिढी यावर आपले मनोगत व्यक्त केले.ते म्हणाले तरुण पिढीने धम्माचा अंगीकार करून आपले जीवन सुसंस्कारित करावे.आपली समाजातील जबाबदारी ओळखून स्वतःबरोबरच समाजाच्या उन्नतीसाठी कायम सम्यक संकल्प करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविकामधे ज्येष्ठ धम्म सेवक सामाजिक कार्यकर्ते महाप्रजापती गौतमी बुद्ध विहार अध्यक्ष ॲड शंकरराव नारनवरे यांनी बुद्ध विहारातील विविध उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचलन एम जी गाढे यांनी केले.वर्षावास निमित्त अश्विन पौर्णिमा पर्यंत बोधिसत्व भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संशोधित ग्रंथ बुद्ध आणि त्यांचा धम्म दररोज वाचन व्ही आर पवार हे करत आहेत.यावेळी रामभाऊ शेजूळ,व्हि के गायकवाड,म्हस्के बाबा,बबन देवकर,रत्नप्रभा भानुदास बागूल,डि.एस नारनवरे,सुमन गाढे,रंजना गायकवाड,आशा अंभोरे,इंदुबाई धधर,निलावती सोनपसारे,सुमन पठारे,मालनबाई शेजवळ,सरस्वती दाभाडे,महानंदा भुईगळ,शशिकला मस्के,प्रयागबाई साबळे,के सी मेश्राम,धाबर्डे आजी,अन्नपूर्णताई खोब्रागडे, निर्मलाताई सुखदेवे यांच्यासह परिसरातील उपासक आणि उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विशाल दहाटचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सत्कार




तिवसा : तालुक्यातील उंबरखेड येथील अत्यंत गरीब परिस्थितीतील युवक विशाल दहाट याची त्याने अंगी बाळगलेल्या जिद्द व चिकाटीच्या जोरावर विद्युत सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडीचे वतीने विशाल दहाट याचे घरी भेट देऊन युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

जेमतेमच्या परिस्थिती सोबत झगडून आपल्या कुटूंबाला सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या विशालने शेत- मजुरीचे कामे करून आय टी आय चे प्रशिक्षण घेतल्यानंतर आपली जिद्द, चिकाटी कायम ठेवल्याने आज अखेरीस विद्युत सहाय्यकच्या यादीत विशाल नाव झळकले आहे. त्याने मिळवलेल्या यशाने सर्वत्र आनंदाचे वातावरण असून वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशाल याचे उंबरखेड येथील घरी भेट देऊन जिल्हा महासचिव सागर भवते यांचे हस्ते शाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड पुस्तक व सन्मानचिन्ह देऊन विशाल दहाट याला सन्मानित केले. याप्रसंगी स्पर्धेच्या युगात युवकांनी निराश न होता प्रचंड मेहनत, जिद्द, चिकाटी व अफाट आत्मविश्वास अंगी बाळगल्यास यशाचा मार्ग गाठता येतो विशालच्या निवडीने हा विश्वास दिला असल्याचे प्रतिपादन युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते यांनी केले तर माझ्या निवडीची प्रेरणा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्याचे विशाल दहाट याने सांगीतले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सदस्य बबलू मुंद्रे, माजी तालुका उपाध्यक्ष डॉ. धर्मेद्र दवाळे, निलेश सोनोने, सागर गोपाळे, राहुल गोपाळे, नंदू मुंद्रे, आकाश मुंद्रे, भारतीय बौद्ध महासभाचे भारत दहाट, विनोद खाकसे, वंचित बहुजन महिला आघाडीच्या रुपाली मुंद्रे, वृषाली गोपाळे, सरिता दहाट सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुनीर यांनी भारताला क्षेपणास्त्र हल्ल्याची धमकी दिली

वॉशिंग्टन : द प्रिंटमधील एका वृत्तात असा दावा करण्यात आला आहे की, पाकिस्तानचे फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी भारताला अणुयुद्धाची धमकी दिली आहे. मुनीर म्हणाले की, सिंधू जल करार स्थगित केल्याबद्दल भारतावर १० क्षेपणास्त्रांनी हल्ला करून तो नष्ट केला जाईल. असीम मुनीर म्हणाले, भारताच्या या निर्णयामुळे २५ कोटी लोकांना उपासमारीचा धोका निर्माण होऊ शकतो. ते पुढे म्हणाले, आपण अण्वस्त्रधारी राष्ट्र आहोत आणि जर आपल्याला असे वाटत असेल की आपण बुडत आहोत, तर आपण अर्धे जग आपल्यासोबत घेऊन जाऊ. पाकिस्तानी व्यापारी अदनान असद यांनी टाम्पा येथील ग्रँड हयात हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या रात्रीच्या जेवणात असीम मुनीर यांनी ही धमकी दिली. या डिनरमध्ये पाकिस्तानी डायस्पोराचे सुमारे १२० सदस्य उपस्थित होते.

# रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**सा. निळे प्रतिक वृत्तसेवा**

परभणी /प्रतिनिधी : समाजहितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या समाजहित अभियान प्रतिष्ठानने आपल्या चौथ्या वर्धापन दिनी परभणी शहरातील रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून वर्धापनदिन विशेष पद्धतीने साजरा केला.

हा उपक्रम ८ ऑगस्ट रोजी रमाबाई आंबेडकर विध्यार्थी वसतिगृह डॉ. आंबेडकर नगर, जिंतूर रोड, परभणी येथे संपन्न झाला .या प्रसंगी विद्यार्थ्यांना वही, पेन यां सारख्या आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत प्रतिष्ठानने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली. समाजहित अभियान प्रतिष्ठान ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, गरजूना मदत, जनजागृती, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, अन्नदान, वस्त्रदान, साडी वाटप, रेशन किट वाटप, रक्तदान अशा विविध उपक्रमांमधून समाजासाठी सातत्याने कार्यरत असते. गेल्या चार वर्षांत प्रतिष्ठानने घेतलेल्या या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

कार्यक्रमाला समाजहित अभियान प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष तसेच लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघ परभणी जिल्हा कार्याध्यक्ष, रुग्णहक्क संरक्षण समिती मराठवाडा कार्याध्यक्ष तथा रमाबाई आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळ, परभणीचे सचिव प्रमोद अशोकराव अंभोरे, रुग्णहक्क संरक्षण समिती आणि लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार दिलीप बनकर, युनुस कच्ची, राहुल तूपसमुंद्रे, संदीप वायवळ, शेख कलीम आदी मान्यवर उपस्थित होते.

# ''गायनातून विचारांची मशाल पेटवणारी, पण आयुष्याच्या सायंकाळी विस्मरणात गेलेली, लोकप्रिय गायिका सुषमादेवी''

## समाजातील दानशूर व्यक्तींना मदतीचे आवाहन

फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा प्रकाश असलेलं गायन हे केवळ कला नाही, ते सामाजिक समतेसाठी लढणारा आवाज आहे. हा आवाज आजही दुमदुमत ठेवणाऱ्या, संपूर्ण आयुष्य विचारप्रेरणीत घालवणाऱ्या भीमशाहिरा सुषमादेवी यांचा उल्लेख न होता आंबेडकरी चळवळ पूर्ण होऊ शकत नाही.

त्यांचे गायन हे केवळ गाणं नाही, ती एक आर्त हाक आहे. माणूसपणासाठी,. सन्मानासाठी, स्वातंत्र्यासाठी! गेली अनेक दशके त्यांनी गावोगावी, वस्तीवस्तीत, शहरा शहरात, आणि विविध सभागृहांमध्ये विचारांचं बीज रोवण्याचं काम केलं. त्यांच्या आवाजात एक वेगळी जादू आहे, एक करुणा, एक प्रखरता, एक सत्व आहे.

परंतु आज, या आवाजाला समाज विसरत चाललाय.



७४ वर्षांच्या वयात, दहा बाय दहाच्या भाड्याच्या खोलीत दयनीय, आर्थिक विवंचनेत एकट्या राहणाऱ्या या मातेला समाज विसरतो आहे. दोन वर्षांपूर्वीच त्यांच्या पतींचं दुःखद निधन झालं, आणि त्यांचा एकमात्र आधारवडही कोसळला.आज ना कुठे कार्यक्रम, ना कुठे बोलावणं, ना मोठ्या मंचावर गौरव. ''भिमशाहीर'' या बिरुदाच्या मागे लपलेली व्यथा समाज जाणीवेतून आपण कधी ऐकणार आहात कीं नाही.? काही गायक-कलावंत पैसा, प्रसिद्धी, राजकीय पाठबळ यांच्या जोरावर मंच झाकून टाकतात, पण सुषमा देवी यांनी फक्त विचार, सत्व, आणि आंबेडकरी तळमळीच्या आधारे प्रामाणिकपणे आपली वाट चालत आहे. आज त्यांना कार्यक्रम सुध्दा नाकारले जात आहेत, त्यामुळे त्यांचा जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपण म्हणतो, बाबासाहेबांचे विचार आभाळाएवढे आहेत. हो, नक्कीच आहेत. पण आभाळात हा एक आवाज समाजाच्या दुर्लक्षितपणामुळे क्षीण होत चालला आहे. आणि आपल्याला तों पुन्हा बुलंद करायचा आहे. आज अशा तळमळीच्या कलावंताना, समाजाने उभं करून देण्याची गरज आहे. सुषमादेवी यांच्यासारख्या कलाकारांसाठी समाजाने एकजुटीने उभं राहिलं पाहिजे. त्यांच्या कार्याचा सन्मान केवळ टाळ्यांनी नव्हे, तर ठोस आर्थिक पाठबळाने झाला पाहिजे. त्यांच्या असलेल्या गरजा आपण ओळखल्या पाहिजेत. त्यांना ''दया नव्हे, आदर आणि कृतज्ञता'' मिळाली पाहिजे. आपण या संधीने त्यांना बळ देऊया! १५ ऑगस्ट २०२५ रोजी, महाकवी वामनदादा कर्डक, आणि शिक्षण महर्षी माधवराव बोरडे जयंती निमित्त, निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, गायिका सुषमा देवी यांच्या ''भीमसंगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. यांच्यासोबत, हा कार्यक्रम मौलाना आझाद रिसर्च सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे दुपारी एक वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने समाजमन जागृत असलेले दानशूर नागरिक, संस्था, संघटना यांनी उपस्थित राहून या प्रतिभाशाली, पण उपेक्षित कलावंताला मान, सन्मान आणि बळ द्यावं. असे आवाहन निळे प्रतीकच्या वतीने करण्यात येत आहे. आपण मदत करतो, ही बाब बाबासाहेबांच्या ''प्रबोधनाच्या मिशन''ला खरा निळा सलाम असेल. ''कलावंत जिवंत असतो, तोवर समाजाचं अंतरंग बोलतं असतं. कलावंत उपेक्षित असतो, तेव्हा समाजाच्या अंतःकरणाची सुन्नता उघडी पडते!'' चला, एक आवाज वाचवूया. एक प्रेरणा जगवूया. एका कार्याचा गौरव करूया.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाची गजानन महाराज मंदिर येथे भाजी मंडई शाखेचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर : रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाच्या गजानन महाराज मंदिर भाजी मंडई शाखेचे उद्घाटन दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी, रविवारी पक्षप्रमुख लोकनेते राजूभाई साबळे यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. अविनाश थिट्टे, मराठवाडा उपाध्यक्ष सुनील खरात, शहरप्रमुख रणजित मनोरे, प्रभारी जिल्हाध्यक्ष जयनाथ बोर्ड, युवा शहरप्रमुख अर्शद लखपती, प्रकाश घोरपडे, विजय सदावर्ते, शेख झहीरभाई, शाहीर अशोक शिरसाठ, शाहीद लखपती, गणेश गौरय, दीपक कोकणे, राज लखपती आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यकारिणीची निवड खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आली अध्यक्ष मालतीताई आव्हाड उपाध्यक्ष रामेश्वर पुरे, पाटील शाहिद बागवान, शेख झहीर सचिव दिशा खंडागळे, सुमनबाई जोहरले संघटक मैनाबाई पटेकर, सत्यभामा राऊत सहसंघटक दीपक खाडे, संदीप फुले सल्लागार सलीम बागवाण, गणेश म्हस्के, जगन मानकरी, तुकाराम मुंढे, फिरोज शेख, राजू उगले, प्रल्हाद शेजूळ सदस्य लक्ष्मीबाई संत्रे, अलका साळवे, लताबाई कोकणे, संगीता मानकरी, निर्मलाबाई राऊत, अनिता मुंडे, विजयामाला फाटककर, छायाबाई डोळसे, आम्रपाली रत्नपारखे, कांताबाई साळवे, मंगलबाई डोंगळे, मंदाबाई खंडागळे, कांचनबाई रोकडे, पंचशीलाबाई केदारे आदी. उद्घाटन कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


# इस्रायली हल्ल्यात अल जझीराचे ५ पत्रकार ठार

गाझा : गाझाच्या अल शिफा रुग्णालयात इस्रायली हल्ल्यात किमान ५ पत्रकारांचा मृत्यू झाला आहे. अल जझीराच्या वृत्तानुसार, मृतांमध्ये पत्रकार अनस अल-शरीफ आणि मोहम्मद कारीकेह, कॅमेरामन इब्राहिम झहीर, मोआमेन अलिवा आणि मोहम्मद नौफल यांचा समावेश आहे. अहवालानुसार, हे पत्रकार रुग्णालयाबाहेरील एका पत्रकार तंबूत राहत होते. या हल्ल्यात एकूण ७ जणांचा मृत्यू झाला. हल्ल्यानंतर लगेचच, इस्रायली सैन्याने कबूल केले की त्यांनी पत्रकार अनस अल-शरीफ यांना लक्ष्य केले होते. इस्रायली सैन्याने अनसला दहशतवादी म्हणून वर्णन केले आणि दावा केला की तो हमासमधील दहशतवादी सेलचा प्रमुख म्हणून काम करत होता.

# वनरक्षक पोटे साहेबांची धडाकेबाज कारवाई

चिखली / सिद्धार्थ पैठण : तब्बल वीस वर्षांनंतर अंचरवाडी बीटमध्ये झालेल्या वन विभागाच्या धडाकेबाज कारवाईने तालुक्यात खळबळ उडाली आहे. अवैध शिकारींचे धाबे दणाणून सोडत वनरक्षक गजानन पोटे यांनी दाखवलेली तत्परता सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी सुमारे बारा वाजता मौजे अमोना येथील गट क्रमांक १३४ मधील बाजीराव सुदामा वानखेडे यांच्या शेताच्या दक्षिणेस (अमोना-देऊळगाव घुगे-कोनड शिव) काही शिकाऱ्यांनी काळवीट पकडले होते. मात्र, शेतकरी व शिकारी यांच्यात वाद निर्माण झाला आणि झटापटीत शिकाऱ्यांनी शेतकऱ्यावर हत्याराने वार करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने जखम गंभीर नव्हती. आरडाओरड ऐकून आसपासचे शेतकरी धावून आले आणि शिकाऱ्यांचा डाव फसला. घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी तात्काळ घटनस्थळी पोचले व जखमी शेतकऱ्याला उपचारासाठी दवाखान्यात हलवले. वारिस्ट अधिकारी ए. एन. ठाकरे यांच्या आदेशानुसार वनरक्षक गजानन पोटे यांनी घटनास्थळी असलेल्या दोन पल्सर व



एक स्प्लेंडर मोटारसायकल ताब्यात घेतल्या. पकडलेल्या काळवीटाला आवश्यक वैद्यकीय तपासणीनंतर योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कलम ९, ४४, ३९, ४८अ, ५०(१)(क) व ५१(१) नुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंचरवाडी बीटमध्ये अनेक वर्षांपासून वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती व हैदोस सुरू होता; मात्र पहिल्यांदाच दबंग व तत्पर अधिकारी मिळाल्याने ग्रामस्थांनी दिलासा व्यक्त केला आहे. या कारवाईत श्री. गजानन पोटे यांच्यासह नेवरे वनपाल, बकाल वनपाल, मुंढे वनरक्षक, मडावी वनरक्षक, ऋषी तुपकर वनसेवक तसेच इतर कर्मचारी सहभागी झाले होते. पोटे यांच्या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत असून, वन्यजीव संरक्षणासाठी ही कारवाई ऐतिहासिक ठरत असल्याचे मानले जात आहे.